जा.क्र./पोउआ/वाह/2708/२०२०

प्रेसनोट दिनांक 11 /09/२०२०

केळगाव चौक ते चिंबळी येथे भामा आसखेड योजने अंतर्गत १६०० मि.मि. व्यासाची पाईपलाईन टाकणेसाठीचे काम करण्याचे नियोजीत आहे. ज्याअर्थी पिंपरी चिंचवड शहरातील वाहतुक सुरक्षित व सुरळीतपणे होणेकरीता, महाराष्ट्र शासन गृह विभाग क्र. एम. व्ही. ए. ०१९६/८७१/सी आर - ३७/टी आर ए - २, दिनांक - २७/०९/१९९६ चे नोटीफिकेशन नुसार मोटार वाहन कायदा कलम ११५, ११६(१) (ए) (बी), ११६(४) आणि ११७ अन्वये मला प्राप्त झालेल्या अधिकाराचा वापर करुन प्राप्त हरकती व सुचनांचा विचार करून मी सुधीर हिरेमठ पोलीस उप-आयूक्त वाहतुक शाखा, पिपंरी चिंचवड शहर, सदर रस्त्यावरील पाण्याच्या पाईपलाईनचे काम पूर्ण होईपर्यंत किंवा ६० दिवसाकरीता खालील प्रमाणे वाहतूक बदल करण्यात येत आहेत.

## दिघी आळंदी वाहतुक विभाग अंतर्गत

केळगाव चौक आळंदी ते चिंबळी नाशिक हायवे दरम्यान जाणारी वाहतुक मोशीमार्गे आळंदीकडे इच्छित स्थळी जातील.

11.09.2020

(सुधीर हिरेमठ)भा.पो.से.
पोलीस उप-आयुक्त,
वाहतुक शाखा, पिं.चिं.शहर

प्रति,

जिल्हा माहिती व प्रसिध्दी अधिकारी,
नविन मध्यवर्ती इमारत, पुणे – ०१

प्रत:-

१)पोलीस निरीक्षक, प्रेसरुम, पोलीस आयुक्त कार्यालय, पिंपरी चिंचवड शहर.

२/- सदर प्रेसनोटच्या प्रती पत्रकारांना देवून, सदरची बातमी वर्तमानापत्रातून प्रसिध्द करण्याची विंनती करावी.

२)सहा. पोलीस आयुक्त, वाहतूक शाखा, पिंपरी चिंचवड शहर.

३) पोलीस निरीक्षक दिघी आळंदी वाहतूक विभाग पिंपरी चिंचवड शहर.

२/- सदर प्रेसनोटच्या प्रती संबंधित दुकानदार/ प्रतिष्ठीत व स्थानिक नागरिक यांना तात्काळ अदा करुन त्यांची स्वाक्षरी घेवून ती प्रत इकडील कार्यालयात रिपोर्टासह दोन दिवसात सादर करावी.

४) कार्यकारी अभियंता,भामा आसखेड पाणी पुरवठा प्रकल्प,पुणे महानगरपालिका पुणे

२/- सदर ठिकाणी वरील वाहतूक वळविणारे फलक बसविणेची कार्यवाही होणेस विनंती आहे.